कायदा. बोअर सरकारनें कायद्याच्या शस्त्रागारांतून बाहेर काढला. " आशिया खंडांतील कोणतेही रहिवासी—कुली, आरब, मलायी व तुर्कांच्या राज्यांतील मुसलमान प्रजाजन " यांस हा कायदा लागू करण्यांत आला. पौर्वात्य लोकांवर बोअर सरकारनें हें कायद्याचें अस्त्र फेंकिलें, तेव्हांपासून, कोणीही मनुष्य–मग त्याचा दर्जा केवढाही असो—' कुली ' ह्या नांवानें बोअर लोकांच्या लोकसत्ताक राज्यांत संबोधण्यांत येऊं लागला. कायद्याच्या उपरिनिर्दिष्ट अपमानकारक व्याख्येखालीं मोडणाऱ्या सर्व लोकांनीं ट्रान्सवालच्या लोकसत्ताक राज्याच्या हद्दींत पाय ठेवल्यापासून आठ दिवसांच्या आंत आपलें नांव नोंदलें पाहिजे. नाहीं तर कडक शासन होईल असा निर्बंध सदरहु कायद्यान्वयें ठरविण्यांत आला. याचप्रमाणें, नांवनोंदणीबद्दल पंचवीस पौंड ( २७५ रुपये ) फी ठरविण्यांत आली होती. नांवनोंदणीचा हा कर मागाहून तीन पौंडपर्यंत कमी करण्यांत आला व वर्षांतून एक वेळच रक्कम भरण्याचा नियम करण्यांत आला. १८८५ च्या ह्या कायद्यान्वयें, कोणाही ' कुली ' ला स्थापित मालमत्ता संपादन करण्याची मनाई झाली; मग राजकीय आणि म्युनिसिपल मताधिकार मिळविण्याचें तर नांवच घेणें नको. 'कुलीं'नीं कांहीं विवक्षित प्रदेशांतच राहावें असाही निर्बंध ह्या कायद्यानें ठरविला. पुढें, ब्रिटिश सरकारकडून आग्रहाचा इशारा मिळाल्यामुळें बोअर सरकारनें ' आरोग्यविषयक कारणांकरितां ' हे शब्द 'कुलींच्या' निवासस्थानासंबंधाच्या नियमास जोडले. परंतु पुढें बोअर सरकारानें कायद्याचा अर्थ करितांना आपल्या पांडित्याची कमाल केली. अमुक लोकांनीं विवक्षित प्रदेशांतच राहावें या नियमाचा अर्थ बोअर सरकार असा करूं लागलें कीं, सदरहु लोकांनीं व्यापारही पण त्या प्रदेशाच्या मर्यादेंतच करावा. बोअर सरकारच्या ह्या भाष्यास नंतर कायद्याच्या कोर्टांत कसोटी लावण्यांत येऊन, हायकोर्टानें पण हिंदी लोकांच्या विरुद्धच निकाल दिला! ' वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा ' ह्या कव्युक्तीच्या सत्यतेचें ह्याहून जास्त ढळढळीत उदाहरण कशास पाहिजे ? असो. ट्रान्सवालांतील न्यायदेवतेनेंहि प्रबळांचा असत्पक्ष खरा ठरविला तरी ह्या बाबतींत तेथील लोकसत्ताक राज्याशीं बोलणें चालविण्याचा हक्क मि. चेंबर्लेन-इंग्लंडचे तत्कालीन वसाहत खात्याचे सेक्रेटरी यांनीं आपणाकडे राखून ठेविला. पुढें चौदा वर्षेपर्यंत म्हणजे बोअर लोकांशीं इंग्रजांचा निर्वाणीचा रणसंग्राम सुरू होईपर्यंत ट्रान्सवालांतील हिंदी लोकांच्या तक्रारींची दाद लावण्याकरितां ब्रिटिश-सरकार अप्रतिहत खटपट करीत होतें. इ. स. १८९९ सालीं तर मि. चेंबर्लेन यांनीं स्पष्टपणें जाहीर केलें कीं, हिंदी लोकांच्या तक्रारी हें युद्धाचें एक कारण आहे. प्रधानमंडळापैकीं, लॉर्ड लान्सडौन व लॉर्ड सेल्बोर्न यांनींही ब्रिटिश साम्राज्यांतील हिंदी प्रजाजनांस वाईट रीतीनें वागविण्यांत येतें ह्या गोष्टीचा निषेध केला. राणीसाहेबांचें प्रबळ सरकार हिंदी लोकांच्या तक्रारींची दाद लावण्याच्या बाबतींत अगदीं निर्बल आहे असें जगजाहीर झालें; तर हिंदुस्थानच्या तीस कोटी प्रजाजनांस काय वाटेल ? असा लॉर्ड लान्सडौ

यांनीं आपल्या भाषणांत प्रश्न केला; व लॉर्ड सेल्बोर्न यांनीं आपल्या भाषणांत स्पष्टपणें सांगितलें कीं, जगाच्या कोणत्याही भागांतील ब्रिटिश प्रजाजनांचे—मग हे प्रजाजन युरोपियन वसाहतवाले असोत किंवा हिंदी लोक असोत—ब्रिटिश लोक ट्रस्टी—हिताहिताचे वाली—आहेत. यासंबंधानें आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, ट्रान्सवालची राजधानी प्रिटोरिया शहर येथील ब्रिटिश एजंटानें आग्रहपूर्वक बोलणें चालविल्यावरून बोअर सरकारानें हिंदी व्यापाऱ्यांना तीन पौंड कर मागितला नाहीं व म्हणून त्यांनीं हा कर दिला नाहीं; आणि त्यावरून त्यांची नांवनोंदणीही झाली नाहीं. आणखी एके प्रसंगी, ठरीव प्रदेशाबाहेर व्यापार करणाऱ्या हिंदी लोकांना व्यापार करण्याबद्दलची मंजुरी देण्याचें लोकसत्ताक बोअर राज्यानें नाकारिलें तेव्हां, मंजुरीबद्दलची फी भरा; व फी भरूनही मंजुरी मिळाली नाहीं तर मंजुरीवाचूनच बेधडक व्यापार चालवा, असा ब्रिटिश एजंटनें हिंदी लोकांस सल्ला दिला. मंजुरीवाचून व्यापार चालविल्याबद्दल कांहीं लोकांस पकडण्यांत आलें तेव्हां त्यांनीं जामीन किंवा दंड न देतां तुरुंगांत जावें, हा ठराव ब्रिटिश एजंटानें मान्य केला. यावरून, ट्रान्सवालांतील सांप्रतची अप्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ बोअर युद्ध होण्यापूर्वींच सुरू झाली होती व खुद्द ब्रिटिश एजंटाचेंही या चळवळींत अंग होतें, ही गोष्ट स्पष्टपणें कोणासही समजून येईल.

इंग्रजांचें बोअर लोकांशीं युद्ध उपस्थित होऊन रणकुंड पेटलें तेव्हां ब्रिटिश हिंदी लोकांना युद्धविषयक कारणामुळें ट्रान्सवाल सोडून जावें लागलें. युद्धानंतर ट्रान्सवाल इंग्रजी अमलांत आलें; पण तेणेंकरून हिंदी लोकांनीं रदहू लढाईंत इंग्रजांस मदत केली असताही त्यांची स्थिति सुधारली नाहीं. गोरेगोरे एक झाले, व हिंदी लोकांची दैना अधिकच वाढली. त्यांना ट्रान्सवालांत येण्याची रडतखडत परवानगी मिळाली खरी. परंतु हें त्यांचें पुनरागमन संकुचित संख्यामर्यादेनें आंखलेलें व अनेक प्रकारच्या निर्बंधांनीं आणि अडचणींनीं जखडलेलें असें होतें. युद्धानंतर प्रस्थापित झालेल्या राज्यव्यवस्थेच्या स्वरूपामुळें त्यांना अनेक निर्बंध पाळावे लागले व युद्धापूर्वी जे हिंदी लोक ट्रान्सवालमध्यें होते, त्यांनाच फक्त ट्रान्सवालांत प्रवेश करण्याची मुभा नवीन इंग्रजी सरकार ठेवणार आहे अशी बातमी प्रसिद्ध झाली. परिस्थितीकडे लक्ष देऊन हिंदी लोकांनीं या स्थितींतच समाधान मानलें. परंतु, ही व्यवस्था आपण आपखुषीनें व युरोपियन वसाहतवाल्यांच्या मनोवृत्तीस मान देण्याकरितां म्हणून मान्य देण्याकरितां म्हणून मान्य करीत आहों—सरकारला ही व्यवस्था हिंदी लोकांकडून मान्य करविण्याचा हक्क आहे अशा समजुतीनें आपण ती मान्य करीत नाहीं असें त्यांनीं त्यावेळीं स्पष्टपणें सरकारास कळविलें. इ. स. १९०२ युद्धांतून नुकत्याच बाहेर पडलेल्या देशांत शांतता, सुव्यवस्थितता व सुराज्य यांची प्रस्थापना करण्याच्या उद्देशानें 'पीस प्रिझर्वेशन ऑर्डिनन्स' नामक "शांतता संरक्षक" कायदा पास करण्यांत आला. या कायद्यान्वयें, वसाहतींत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या सर्व लोकांना स्वमतानुसार परवाने देण्याचा वा न देण्याचा अधिकार वसाहतीच्या गव्हर्नरास मिळाला. परंतु, प्रत्यक्ष व्यवहारांत गुन्हेगार लोक, वारांगना व निः-

ज्वळ बदमाष लोकांप्रमाणें, युद्धापूर्वी ट्रांस-वालांत आपलें वास्तव्य होतें असें ज्यांना सिद्ध करितां आलें नाहीं अशा सर्व हिंदी लोकांना वसाहतींत प्रवेश करण्याची मनाई होऊं लागली. वारांगना व बदमाष यांच्या पंक्तीस हिंदी लोकांस बसविण्यांत येतें ही गोष्ट सदरहू प्रकारावरून उघड होते! असो; ह्याप्रमाणें, प्रथमारंभीं जे प्रवेश-परवाने देण्यांत आले त्यांत परवाने बाळगणारांची तोच हा गृहस्थ अशी ओळख पटण्यासंबंधीं खाणाखुणा घेण्याची व्यवस्था करण्यांत आली. पूर्वी तीन पौंड भरल्यावर पावतीदाखल जें नांवनोंदणीचें सर्टिफिकेट मिळत असे त्यांत मनुष्याची ओळख पटण्यासंबंधीं व्यवस्था केलेली नव्हती. वसाहतींतल्या सर्व हिंदी रहिवाशांनीं हे परवाने मिळविलेच पाहिजेत असा सक्त हुकूम करण्यांत आला.

ह्या प्रसंगीं, युद्धापूर्वी ट्रान्सवालांत ज्यांचें वास्तव्य नव्हतें अशा हिंदी लोकांची वसाहतींत खेंचाखेंची होऊन गर्दी होत आहे अशी हिंदी लोकांच्या युरोपियन व्यापारी प्रतिस्पर्ध्यांनीं पुनः ओरड करण्यास सुरुवात केली. त्यावेळीं लॉर्ड मिल्नर हे हाय कमिशनर व गव्हर्नर होते. त्यांनीं तावडतोब सक्त चौकशी केली; व चौकशी अंतीं समजून आलें कीं, हिंदी लोकांचा वसाहतींत गुप्त व बेकायदेशीर संचार झाल्याचे आरोप खोटे आहेत. ह्यापूर्वी लॉर्ड मिल्नर यांच्या हाताखालच्या कांहीं अंमलदारांचें नीतिभ्रष्टतेचें वर्तन झाल्याचें ट्रान्सवालांतील ब्रिटिश इंडियन असोसिएशननें लॉर्ड मिल्नर यांना सिद्ध करून दाखविलें होतें; व नंतर लॉर्ड मिल्नर यांनीं ह्या अंमलदारांना कामावरून बडतर्फही केलें. पौर्वात्य लोकांची वसाहतीवर 'टोळधाड' येण्याची भीति नाहीं अशी लॉर्ड मिल्नर यांची स्वतःची जरी पूर्ण खात्री झाली होती तथापि पौर्वात्य लोकांच्या प्रवेशाविरुद्ध चळवळ करणाऱ्या चळवळखोरांस बोलण्यास जागा राहूं नये म्हणून त्यांनीं हिंदी लोकांच्या पुढाऱ्यांचें साहाय्य मागितलें. नांवनोंदणीचीं बोअर सर्टिफिकेटें बदलून नवीन इंग्रजी रियासतींतील परवाने घेण्याची आपल्या देशबांधवांस सल्ला देण्याविषयीं त्यांनीं ह्या पुढाऱ्यांस आग्रहपूर्वक सांगितलें. ह्यामुळें परवाने बाळगणारांच्या ओळखीसंबंधानें पंचाईत पडणार नाहीं व त्यांवर आंगठ्याचे ठसे असावेत, असें मिल्नरसाहेब म्हणाले. ह्या सूचनेचा हिंदी लोकांनीं विचार करून त्याप्रमाणें वागण्याचें मान्य केलें; परंतु, आपण हें कृत्य आपखुशीनें सवलतीदाखल करीत आहोंत, असें त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें. ही नांवनोंदणी अखेरची होईल व नवीन परवाने बाळगणारांस वास्तव्याचा प्रवेशाचा व पुनःप्रवेशाचा चिरस्थायी हक्क प्राप्त होईल असें लॉर्ड मिल्नर यांनीं आश्वासनपूर्वक सांगितलें. ही सक्तीची नांवनोंदणी पुरी झाली तेव्हां ह्या तडजोडीस हिंदी समाजास प्रवृत्त करणाऱ्या हिंदी पुढाऱ्यांचे लॉर्ड मिल्नर यांनीं आभार मानले. मोठ्या गांभीर्यानें देण्यांत आलेलें हें वचन कशा रीतीनें पाळण्यांत आलें हें पुढील हकीकतीवरून दिसून येईलच.

बोअर युद्धापूर्वी, ट्रांसवालांतील हिंदी लोकांची कमींत कमी १३००० संख्या असल्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांकडून गणती करण्यांत आली होती. इ. स. १९०४ सालीं हिंदी लोकांची खानेसुमारी घेण्यांत आली आहे. तेव्हां वसाहतींत हिंदी

लोकांची संख्या १०००० हून कमी आहे असें दिसून आलें. इ. स. १९०६ मध्यें एकंदर १०००० परवाने ब्रिटिश हिंदी लोकांकरितां काढण्यांत आले आहेत; असें सरकारी कागदपत्रीं दाखविण्यांत आलें. ह्यावरून दिसून येईल कीं १९०२ तें १९०६ ह्या दरम्यान हिंदी लोकांची संख्या बोअर युद्धापूर्वीच्या हिंदी लोकांच्या संख्येच्या बरोबरीला येत नाहीं.

जोहान्सबर्ग म्युनिसिपालिटीनें आरोग्य-विषयक बाबतींत अक्षम्य हयगय केल्यामुळें इ. स. १९०४ सालीं जोहान्सबर्ग येथें प्लेग उद्भवला त्यावेळीं हिंदी लोकांचें तेथील निवासस्थान किंवा आखून देण्यांत आलेली वास्तव्यभूमि जळून गेली. त्यामुळें, हिंदी लोक चहूंकडे पसरले; पुष्कळ हिंदी लोक वसाहतींतल्या निरनिराळ्या शहरांत जाऊन राहिले. हिंदी लोकांची फांकाफांक झाली आहे, ह्या संधीचा फायदा घेऊन पौर्वात्यविद्वेषी पक्षानें हिंदी व्यापाऱ्यांविरुद्ध पुनरपि ओरड करण्यास सुरुवात केली. इ. स. १९०४ सालच्या उत्तरार्धांत पौर्वात्यविद्वेषी बोअर व इंग्रज वसाहतवाल्यांनीं एक 'राष्ट्रीय परिषद्' ( नॅशनल कन्व्हेन्शन ) भरवून तेथें अपूर्व विक्षिप्तपणाचे व अचाट ठराव पास केले. ठरींव वास्तव्यभूमींतच हिंदी लोकांना राहण्याची व व्यापार करण्याची परवानगी असावी व यापुढें ट्रान्सवालांत आगमन करणाऱ्या हिंदी लोकांस ते सुसंस्कृत व अत्युच्च दर्जाचे असले तरी ह्या विशिष्ट वास्तव्यप्रदेशांतच राहण्याची सक्ति असावी असे ठराव सदरहू कन्व्हेन्शननें पास केले. ह्या ठिकाणीं पुढील एक गोष्ट नमूद करणें अवश्य आहे. ह्याच वर्षारंभाचे सुमारास, ठरीव वास्तव्यप्रदेशांत राहणें ह्या नियमांत ह्या वास्तव्यप्रदेशांतच व्यापार करणें ह्या नियमाचाही अंतर्भाव होतो असा बोअर राज्याच्या हायकोर्टानें केलेला ठराव रद्द करण्याकरितां हिंदी लोकांनीं इंग्रजी रियासतींतील वरिष्ठ-सुप्रीम-कोर्टाकडे एक अर्ज केला. वसाहत सरकारानें ह्या अर्जास प्रत्यक्ष हरकत आणली तरी शेवटीं न्यायदेवता जागृत असल्यामुळें ठरींव वास्तव्यभूमींत राहण्याच्या निर्बंधांत त्याच वास्तव्यभूमींत व्यापार करण्याचा निर्बंध अंतर्भूत होत नाहीं हें हिंदी लोकांचें ह्मणणें वरिष्ठ कोर्टाच्या निकालानें यथार्थ ठरलें. ह्या कामांत हिंदी लोकांना अपरंपार खर्च आला. ह्यावेळच्या वसाहत सरकारच्या वर्तनावर चीफ जस्टिस यांनीं पुढीलप्रमाणें टीका केली:—

" जो हक्क प्रचलित कायद्याच्या दृष्टीनें बेकायदेशीर आहे असें बादशाही सरकार आजपर्यंत सांगत आलें आहे व गतकालांत बादशाही सरकारनें ज्याचा आवेशपुरस्सर प्रतिकार केला आहे असा हक्क नवीन कायदा झाला नसतां वसाहत सरकारच्या अधिकाऱ्यांनीं पुढें आणावा ही आश्चर्याची गोष्ट आहे. " ह्यानंतर कांहीं दिवसांनीं लॉर्ड सेल्बोर्न यांनीं इंग्रजी वसाहत सरकारच्या वर्तनाचें समर्थन करून असा मुद्दा पुढें आणला कीं, युद्धापूर्वी बोअरसरकार स्वतंत्र होतें व इंग्रज सरकार हिंदी लोकांच्या हक्कांचे पुरस्कर्ते ह्या नात्यानें वागलें; परंतु युद्धानंतर इंग्रजांचें राज्य बोअर लोकांवर झाल्यामुळें बादशाही सरकारचें हल्लींचें कर्तव्य कायदा आहे तसा अंमलांत आणणें हें आहे ! "

इकडे हिंदी व्यापाऱ्यांविरुद्ध चळवळ वाढतच होती. ह्यावेळीं, लॉर्ड मिल्नर यांच्या जागीं लॉर्ड सेल्बोर्न हे आले होते. वसाहतींत 'कुली'ची गुप्त बेकायदेशीर खेंचाखेंच होत आहे अशी लॉर्ड सेल्बोर्न यांच्याकडे तक्रार करण्यांत आली. बारीक चौकशीअंतीं, लॉर्ड सेल्बोर्न यांनींहि ही तक्रार निराधार आहे असा अभिप्राय दिला; परंतु, ह्यामुळें पौर्वात्यविद्वेषी लोकांनीं गम न खातां पौर्वात्य लोकांसंबंधीं राज्यव्यवस्थेचें काम ज्याच्याकडे होतें अशा अंमलदारापुढें आपल्या तक्रारी नेऊन त्यांना आपल्या कांयास वश करून घेण्याचा प्रयत्न केला. पौर्वात्य लोकांसंबंधीं राज्यव्यवस्थेचें काम पूर्वी 'प्रोटेक्टर ऑफ एशियाटिक्स' (पौर्वात्यसंरक्षक) नांवाच्या अधिकाऱ्याकडे असे. नंतर, अधिकाऱ्याचें हें नांव जाऊन त्या जागीं 'रजिस्ट्रार ऑफ एशिआटिक्स' (पौर्वात्यांची नावनोंदणी करणारा अंमलदार) हें नांव स्थानापन्न झालें. ह्यापुढें पौर्वात्यांनीं आपलें संरक्षण होण्याची आशा धरूं नये असाच नामनिर्देशांतील ह्या फेरबदलाच्या योगानें एकापरीनें पौर्वात्यांस इशारा देण्यांत आला! आणि भविष्येतिहासावरून हा तर्क बरोबर ठरला. सदरहू रजिस्टरनें पौर्वात्य लोकांसंबंधीं कायद्याची ओढाताण करून, बादशाही सरकारनें वारंवार कायद्याचा जो अर्थ मान्य करण्याचें सपशेल नाकबूल करून ह्या अर्थवैपरीत्यावर कडक टीका केली होती, तो अर्थ ह्या कायद्यांतून पिळून काढण्याचा प्रथम प्रयत्न केला. परंतु डाव साधला नाहीं. पुढें आणखी नवीन डावपेंच शोधून काढण्यांत आले. हिंदी लोकांच्या परवान्याच्या अर्जांचा विचार करण्यास रजिस्ट्रारला 'मदत' करण्याकरितां म्हणून सल्लागार कोर्ट स्थापन करण्यांत आलें. ह्या कोर्टाचें काम गुप्तपणें चालूं लागलें; कोर्टांत हलक्या पौर्वात्यविद्वेषी अशाच अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यांत आली. ह्या कोर्टांत हिंदी प्रतिनिधि मुळींच नेमण्यांत आला नाहीं. इतकेंच नव्हे तर अर्जदारांना स्वतः किंवा वकिलांमार्फत कोर्टांत हजर रहाण्याची परवानगी नसे. त्याप्रमाणें अर्जदारांविरुद्ध प्रतिकूल पुरावा पुढें आल्यास तो खोडला जाऊं नये, असा ह्या न्यायप्रिय अधिकाऱ्यांनीं बंदोबस्तच करून ठेविला! ह्याचा परिणाम असा झाला कीं, परवान्याबद्दलचे अर्ज एकसहा नामंजूर होऊं लागले. हिंदी लोकांच्या अर्जांच्या ह्या नामंजुरीचा फायदा घेऊन व जादुगिरीच्या 'आंकडेशास्त्राचा' उपयोग करून पौर्वात्यविद्वेषी कटवाल्या लोकांनीं अखेरीस इ. स. १९०६ मध्यें ही शर्यत जिंकली! वसाहतींत हिंदी लोकांचा गुप्त व बेकायदेशीर रीतीनें भरणा होत आहे व हिंदी समाजाचे पुढारी ह्या गोष्टीकडे डोळेझांक करीत आहेत, असे त्यांनीं लॉर्ड सेल्बोर्न यांच्या मनांत भरवून दिलें. ह्याप्रमाणें, जयसंधी फांसे टाकून कटवाल्यांनीं डाव जिंकला. ह्या कपटद्यूताचें पर्यवसान हल्लींचा पौर्वात्य लोकांसंबंधीं कायदा (एशियाटिक लॉ अमेंडमेंट ऑर्डिनन्स) सरकारनियोजित कायदेकौन्सिलांत पास होण्यांत झालें. हा कायदा 'ब्रिटिश हिंदी लोकांना न्यायानें व निःपक्षपातानें वागविण्याकरितां केला आहे, असें वसाहत सेक्रेटरीनीं ह्या कायद्याचें वर्णन केलें! बिचाऱ्या भाषादेवीवरच ही कचकी बळजबरी नव्हे तर काय? अन्यवाक्यांतील

हिंदी लोक जो कायदा रद्द होण्याबद्दल मागणी करीत आहेत तो हाच कायदा होय.

---

## नं. ३

# अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या चळवळीचा संक्षिप्त इतिहास.

अखेर १९०७ साली पौर्वात्य लोकांस-बंधी त्यांस ट्रान्सवालांतून नामशेष करावें या उद्देशाचा नवा कायदा कायदेकौन्सिलच्या टांकसाळींतून मोठ्या डामडौलानें बाहेर पडला. बोअर अमदानींतील १८८५ च्या जुन्या कायद्यांची ह्या ब्रिटिश रियासतींतील नवीन कायद्यानें "सुधारणा" करण्यांत आली आहे, असा दुंदुभिघोष करण्यांत आला. जुन्या कायद्यांत नवीन कडक कानूंची आणखी भर घालणें म्हणजे त्या कायद्यांची सुधारणा करणें असा जर अर्थ असेल तर ह्या नवीन कायद्यानें पूर्वीच्या कायद्यांची खास सुधारणा झाली यांत संशय नाहीं ! ह्या सुधारणेनें नांवनोंदणीची प्रचलित कलमें काढून टाकून त्यांच्या जागीं कडक निर्बंध व नियम स्थानापन्न केले. हे नियम–निर्बंध अशा स्वरूपाचे होते कीं, ज्या हिंदी लोकांकरितां हा कायदा करण्यांत आला ते सर्व चोर, दरवडेखोर, बदमाष इत्यादि कोटींतीलच आहेत असें गृहीत धेऊनच सदर कायद्याची उभारणी करण्यांत आली आहे असें स्पष्टपणें दिसून आलें. शिवाय, वसाहत सेक्रेटरींनीं हा कायदा रूढ करितांना, पौर्वात्य लोकांचा वसाहतींत गुप्त बेकायदेशीर भरणा होत आहे, असा आरोप केला. अर्थात्, हिंदी पुढाऱ्यांच्या संमतीखेरीज हिंदी लोकांचा गुप्त संचार होणें शक्य नसल्यामुळें, वसाहतींत हिंदी लोकांचा गुप्त रीतीनें भरणा करण्याचा कट केल्याबद्दल हिंदी पुढाऱ्यांवर अप्रत्यक्ष आरोप करण्यांत आला; व ह्या काल्पनिक कटाबद्दल शासन म्हणून हा नवीन कायदा करण्यांत आला ! १८८५ च्या ३ च्या कायद्याच्या जुन्या व्याख्येंत जे जातिविषयक व धर्मविषयक अपमान आणि उपमर्द समाविष्ट झाले होते त्यांचा ह्या नव्या कायद्यांतही अंतर्भाव झाला आहे, असें सदरहू कायद्याच्या गर्भितार्थावरून दिसून आलें. ह्या कायद्याच्या चक्रव्यूहांत स्त्रियांसही ढकलण्याचा शांसवाल्यां अधिकाऱ्यांचा बेत होता; परंतु, ह्यासंबधानें हिंदी रहिवाशांची क्रोधज्वाला देदीप्यमान रीतीनें प्रकट झाल्यामुळें हा बेत त्यांना सोडून द्यावा लागला. तथापि, कडेवर बसण्याचें ज्यांचें वय आहे अशा तान्ह्या मुलांसही हा कायदा लागू करण्यांत आला व त्यांची नांवनोंदणी करण्याचा हुकूम झाला ! हीं अर्भकें आठ वर्षांचीं झालीं म्हणजे पुनः त्यांची नांवनोंदणी करावयाची व त्यांचें वय सोळा वर्षांचें झाल्यावर आणखी एकदां सदरहूप्रमाणेंच त्यांची पुनः नांवनोंदणी करावयाची, असें ह्या कायद्याअन्वयें ठरविण्यांत आलें. इंग्लंडांत कांहीं विवक्षित वर्गाच्या गुन्हेगारांस 'टिकेट ऑफ लीव्ह' म्हणून परवाना असतो व ह्या परवान्याप्रमाणें त्यांना अधिकाऱ्यांस आपला राहण्याचा पत्ता वगैरे कळवून सरकारी देखरेखीखालीं राहावें लागतें. बाल्यावस्थेपासून ते उमेदींत येईपर्यंत नांवनोंदणी करण्याचा कायदा हिंदी लोकांस लागू करण्यांत वसाहत सरकारनें त्यांची

ह्या बदमाषांच्या वर्गांतच गणना केली हें उघड दिसतें ! मानभंग व उपमर्द यांची बदरहू कायद्यांत परमावधि झाली. हिंदी लोकांची मानहानि करून त्यांना नीच दर्जाच्या लोकांत मोडणें व त्यांचे हक्क कायम करण्याचें ढोंग करून त्यांना शेवटीं वसाहतपार होण्यास लावणें हा कायद्याचा मुख्य हेतु होय. भवति न भवति होऊन अखेर हा कायदा पास होऊन प्रसिद्ध झाला व हिंदी लोकांच्या गोऱ्या व्यापारी प्रतिस्पर्ध्यांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. आपल्यायी व्यापारविषयक चढाओढ करणाऱ्या हिंदी लोकांचें वसाहतींतून उच्चाटन करण्याचें हें चांगलें साधन उपलब्ध झालें आहे, असें पौर्वात्यद्वेषी गोऱ्या कटवाल्यांस वाटलें. ह्या गोऱ्या कटवाल्यांनीं आकांडतांडव करून, हिंदी लोकांच्या निषेधप्रदर्शनास भीक न घालण्याचें वसाहत सरकारास प्रोत्साहन दिलें.

गोऱ्या व्यापाऱ्यांच्या ह्या आकांडतांडवानें हिंदी लोकांचा सात्विक क्रोधाग्नि प्रदीप्त होऊन जोहान्सबर्ग येथें हिंदी लोकांची जंगी जाहीरसभा भरली. सबंध ट्रान्सवालांतील हिंदी रहिवाशांपैकीं एक चतुर्थांश लोक सभेस आले होते व ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या सर्व ठिकाणच्या स्थानिक कमिट्यांकडून सभेत पास होणाऱ्या ठरावासंबंधानें संमतिदर्शक तारा आल्या. ह्या सभेत दृढनिश्चयपूर्वक शपथ घेण्यांत आली व सर्वानुमतें असा ठराव पास झाला कीं, दुष्टपणाचा व ज्यांत धर्माची विटंबना झाली आहे असा हा कायदा मान्य करण्याऐवजीं हिंदी लोकांनीं खुशाल तुरुंगांत जावें. ह्याच प्रसंगीं, लॉर्ड एल्जिन यांच्याकडे एक डेप्युटेशन पाठवून ह्या कायद्यामुळें हिंदी लोकमत किती प्रक्षुब्ध झालें आहे ह्यासंबंधीं माहिती त्यांना कळविण्यांत आली. ह्या विषयासंबंधानें पुष्कळ वाटाघाट होऊन (ह्या वाटाघाटींत कित्येक वजनदार इंग्रज व आंग्लो-इंडियन लोक होते; ह्या लोकांची पुढें दक्षिण आफ्रिकेंतील ब्रिटिश इंडियन कमिटी स्थापन झाली) शेवटीं लॉर्ड एल्जिन यांनीं कायद्याची अंमलबजावणी तहकूब ठेवण्याचा हुकूम केला. ट्रान्सव्हालला आतां स्वराज्य देण्यांत आलें आहे तेव्हां ह्या बाबतींत पुढें भरणाऱ्या ट्रान्सवाल पार्लमेंटचा अभिप्राय घेतला पाहिजे ह्या मुद्यावर एल्जिनसाहेबांनीं कायद्याच्या तहकुबीचा हुकूम सोडला.

स्वराज्यसंपन्न ट्रान्सवालच्या नवीन पार्लमेंटच्या पहिल्या बैठकीचे वेळीं हा कायदा पार्लमेंटपुढें आणण्याची लॉर्ड एल्जिन यांनीं हा हुकूम काढून अप्रत्यक्षपणें सूचनाच केली, असा एल्जिनसाहेबांच्या हुकुमाचा अर्थ करण्यांत आला ! ट्रान्सवालच्या प्रधानकीची वस्त्रें मिळविण्याची त्यावेळीं आकांक्षा बाळगणारे सर रिचर्ड सॉलोमन यांनीं तर असें ध्वनित केलें कीं, हा कायदा पुनः करण्यांत आला तर ट्रान्सवालच्या नवीन शासनसंस्थेंतील रिझर्वेशन क्लॉज (म्हणजे वसाहत सरकारनें परकीय लोकांसंबंधीं किंवा आफ्रिकेंतील मूळ रहिवाशांसंबंधीं कायदे केल्यास ते नामंजूर करण्याचा साम्राज्य सरकारनें राखून ठेवलेला हक्क) हा रद्द होऊन कायद्यास बादशाही सरकारची मंजुरी मिळेल. अखेर परिणामही पण तसाच झाला. कायदा पार्लमेंटपुढें आला तेव्हां हिंदी लोकांनीं दुसरी एक

जाहीरसभा भरवून सरकारला विनंति केली कीं, हा कायदा सर्वतोपरी आक्षेपार्ह व अनवश्यक असल्यामुळें सरकारनें तो हातांत घेऊं नये. हिंदी लोकांचा वसाहतींत गुप्त संचार होईल अशी जी भीति वसाहत सरकारला वाटत होती ती नाहींशी करण्याकरितां व हिंदी रहिवाश्यांच्या प्रामाणिक हेतूंची साक्ष पटविण्याकरितां, कायदेशीर रहिवाश्यांची उत्तम रीतीनें ओळख पटेल अशा प्रकारें आपखुषीनें नांवनोंदणी करण्याची आपली कबुली हिंदी लोकांनीं सरकारास कळविली. परंतु, हिंदी लोकांचें हें सर्व ह्मणणें अरण्यरुदनवत् झालें. पाषाणहृदयी, स्वार्थैकपरायण व कर्णबधिर वसाहतवाल्यांवर ह्या तळजोडीच्या शब्दांचा कांहीं परिणाम न होतां हिंदी लोकांचें सात्विक बोलणें अरुत्पुरुषसेवेप्रमाणें निष्फळ झालें. कायदा पास झाला व यथावकाशांत बादशाही सरकारच्या पसंतीचें शिक्कामोर्तबही झालें. त्यासमयीं, जनरल बोथा हे इंग्लंडांत होते. वसाहत परिषदेमुळें इंग्लंडावर त्या वेळीं वर्षाकाळांत फोंफावत जाणाऱ्या नदीप्रमाणें साम्राज्यवादाची ह्मणजे गोरे लोकांनीं यथेच्छ रीतीनें इतरांवर निष्कंटक सत्ता चालवावी ह्या दुष्ट राजनीतीची प्रचंड लाट इंग्लंडमध्यें उसळली होती. ह्या साम्राज्यवादाच्या संचाराचा जनरल बोथा यांनीं फायदा घेऊन व ब्रिटिश मुत्सद्यांच्या मुलाखती घेऊन जनरल बोथा यांनीं नवीन कायद्याला बादशाही सरकारची मंजुरी मिळविण्याचा प्रयत्न केला. अखेर बादशाही सरकारची संमति मिळालीच. हें निर्वाणीचें अस्त्र सुटल्यावर अर्थातच मानधन हिंदी लोकांस स्वस्थ बसवेना. ह्या वेळेपासूनच ट्रान्सवालांत हिंदी लोकांच्या अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या चळवळीस सुरवात झाली. आत्म्याच्या नैतिक सामर्थ्यापुढें केवळ पशुतुल्य मनगटाच्या जोराचें कांहीं चालत नाहीं, शारीरिक सामर्थ्यापेक्षां नैतिक शक्तीचा प्रभाव विशेष आहे हें सत्य स्वार्थलोलुप गोऱ्या प्रतिस्पर्ध्यांच्या अनुभवास आणून देण्याचा हिंदी लोकांनीं निर्धार केला. न्यायमूलक नैतिक शक्ति व अन्यायमूलक पशुशक्ति यांच्यामध्यें प्राचीनकाळीं अनेक वेळ झगडे झाले आहेत व ह्या झगड्यांत नैतिक शक्तीचाच विजय झाला आहे. हें इतिहासप्रसिद्ध सत्य ट्रान्सवालांतील हिंदी लोकांनीं आणखी एकवार अनुभवास आणून दिलें यांत संशय नाहीं. सर्व ट्रांसवालभर नांवनोंदणीचीं ऑफिसें उघडण्यांत आलीं; परंतु हिंदी लोकांनीं त्यांकडे ढुंकून दिलें नाहीं. इ. स. १९०७ च्या सप्टेंबर महिन्यांत हिंदी लोकांनीं पांच हजार सह्यांचा एक जंगी अर्ज सरकारकडे पाठवून आक्षिप्त कायदा रद्द करण्याची आग्रहपूर्वक विनंति केली व आपण होऊन स्वयंप्रेरित नांवनोंदणी करण्याची आपली तयारी त्यांनीं आणखी एकदां सरकारला कळविली. परंतु ट्रान्सवालसरकारनें हा अर्ज धुडकावून काढिला. इतक्या अवकाशांत, ट्रांसवालांत येणाऱ्या लोकांची नांवनोंदणी करण्याचा कायदा ( इमिग्रंट रेजिस्ट्रेशन आक्ट ) पास होऊन, ह्या कायद्याअन्वयें नोंदणी न करून घेणाऱ्यांस हद्दपार करण्याचा सरकारास अधिकार मिळाला. वर्षअखेरीस सदरहू आक्टास बादशाही सरकारची मंजुरी मिळाली व त्याबरोबरच मि. गांधी आदि प्रमुख हिंदी पुढाऱ्यांस पकड-

त्यांत घेऊन, विवक्षित मुदतीच्या आंत बहाद्दरपार होण्याचा त्यांस हुकूम झाला. हा हुकुम त्यांनीं मान्य न केल्यामुळें त्यांना बंदिवासांत टाकण्यांत आलें. त्यांस थोड्याफार प्रमाणानें त्यावेळीं राजकीय कैदी मानण्यांत आल्यामुळें सक्तमजुरीची शिक्षा न देतां साध्या कैदेची शिक्षा झाली. नंतर, बहुतेक सर्व हिंदी पुढाऱ्यांना पकडण्यांत येऊन बहाद्दरपार होण्याचा त्यांना हुकूम झाला. धाकदपटशाचा कांहीं परिणाम होत नाहीं असें पाहून वसाहत सेक्रेटरी जनरल स्मट्स यांनीं हडेलहप्पीचें धोरण सोडून देणेंच शहाणपणाचें आहे असा विचार करून बंदिवास भोगीत असलेले मि. गांधी यांच्याशीं समेटाचें बोलणें चालविलें व शेवटीं एक तडजोड ठरविण्यांत आली. या तडजोडीस अनुसरून आपण स्वयंप्रेरणेनें नांवनोंदणी करूं ही हिंदी लोकांची सूचना सरकारनें मान्य केली, आक्षिप्त कायदा तहकूब ठेवण्यांत आला व स्वयंप्रेरित नांवनोंदणीची समाधानकारक रीतीनें पूर्णता झाल्यावर सदरहू कायदा रद्द करण्यांत येईल असें वचन देण्यांत आलें. स्वयंप्रेरणेची ही नांवनोंदणी तीन महिने चालू होती. इ. स. १९०८ च्या मे महिन्याच्या तिसऱ्या तारखेस नांवनोंदणीचें काम संपलें व हें काम समाधानकारक झाल्याचें सरकारनें कबूल केलें. परंतु अनेक कारणांमुळें कायदा रद्द करण्यासंबंधींच आपलें वचन पाळणें जनरल स्मट्स यांना गैरसोईचें वाटलें ! आणि पुढें तर आपण हें वचन दिल्याचेंही त्यांनीं नाकबूल केलें ! ! परंतु, हें वचन देण्यांत आलें आहे व तें पाळलें जाईल अशा समजुतीवरच स्वयंप्रेरित नांवनोंदणी करण्यांत आली ही गोष्ट त्यांस नाकबूल करित आली नाहीं. त्यांनीं एक नवीन तडजोड सुचविली. यापुढें केव्हांही नवीन हिंदी मनुष्यास–ते शिक्षणासंबंधीं अत्यंत कडक अशा कसोटीस उतरले तरी–ट्रान्सवालांत प्रवेश करण्याची मनाई केली जाईल असा कायदा पूर्वीच्या कायद्याचे ठिकाणीं स्थानापन्न करावयाची सूचना त्यांनीं पुढें मांडली व या अटीवर आक्षिप्त कायदा रद्द करण्याची खुषी दर्शविली. हल्लींच्या इमिग्रेशन आक्टाप्रमाणें, सुशिक्षित हिंदी मनुष्यास ट्रान्सवालांत प्रवेश करण्याची परवानगी आहे; परंतु, हा आक्ट व आशियाटिक आक्ट ही दुकल घेतली तर या जोडगोळीनें हिंदी लोकांस प्रवेशाची मनाई करण्यांत आली आहे असा त्यांचा संयुक्त अर्थ तेव्हांच समजून येईल. असो. हिंदी लोक एका अन्यायाचें परिमार्जन दुसरा अन्याय स्वीकारून करण्यास व आगींतून फुफाट्यांत पडण्यास तयार नव्हते. त्यामुळें तडजोडीचें बोलणें सुटून अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या चळवळीस प्रारंभ झाला. तडजोड होण्यापूर्वीची स्थिति प्राप्त होण्याकरितां हिंदी लोकांनीं प्रयत्न केला व स्वयंप्रेरित नांवनोंदणीचे आपले फॉर्म परत मिळण्यासंबंधीं हुकूम व्हावा असा त्यांनीं बादशाही सरकाराकडे अर्ज केला. परंतु, बादशाही सरकारनें अशा प्रकारचा हुकूम करण्याचें नाकारिलें. त्यावरून, दांभिकतेचीं खोटीं वचनें देऊन, स्वयंप्रेरित नांवनोंदणीचीं जीं सर्टिफिकिटें लोकांस देण्यांत आलीं होतीं त्यांपैकीं १५०० सर्टिफिकिटें हिंदी लोकांनीं एक जाहीरसभा भरवून जाहीर रीतीनें जाळून टाकलीं. यासमयीं, ट्रान्सवालचे जुने रहिवाशी असलेले परंतु माघा-

हून नाताळांत गेलेले हिंदी पुढारी ट्रान्सवालांत आपल्या देशबंधूंस सहाय्य करण्याकरितां आले होते त्यांना सरकारनें तुरुंगांत टाकून सक्तमजुरीच्या शिक्षा दिल्या. नंतर, वसाहत सरकारनें एक कायदा पास करून पूर्वी झालेली स्वयंप्रेरित नांवनोंदणी कायदेशीर ठरविली व वसाहतींत राहणाऱ्या परंतु त्यावेळीं गैरहजर असलेल्या पौर्वात्य लोकांच्या नांवनोंदणीची व्यवस्था मुक्रर केली. परंतु, हा कायदा तत्त्वतः निरुपद्रवी स्वरूपाचा होता तरी त्यायोगें जुना आक्षिप्त कायदा रद्द झाला नाहीं किंवा सुशिक्षित हिंदी लोकांचा दर्जाही योग्य रीतीनें ठरविण्यांत आला नाहीं. या कारणास्तव, सदरहू कायद्याचा स्वीकार करण्याचें हिंदी लोकांनीं नाकारिलें.

कार्यकारणपरंपरेची येथपर्यंत मजल येऊन ठेपली तेव्हांपासूनचा आतांपर्यंत इतिहास केवळ हिंदी लोकांच्या दुःसह दुःखभोगाची व अपमानाची कटू कहाणी आहे. कारागृहवास, उपासमार, गृहसौख्याचा नायनाट, तीव्रातितीव्र क्लेश, देहभंग, हृदयभंग, आशाभंग वगैरे अनेक दारुण संकटपरंपरा ते भोगीत आले आहेत व भोगीत आहेत. परमप्रिय स्नेहसंबंध व कुटुंबसौख्य यांतून हिंदी लोकांना ओढून काढून भराभर तुरुंगांत टाकण्यांत येत आहे. दक्षिण आफ्रिकेंतील मूळच्या रानटी रहिवाशांप्रमाणें त्यांना तुरुंगांत पशुतुल्य वागविण्यांत येतें. त्यांस देण्यांत येणारें जेवण व उपासमार यांत भेद नाहीं, त्यांच्या तक्रारी धुडकावून लावण्यांत आल्या आहेत आणि सहानुभूतिशून्य व दुष्ट अंमलदारांनीं त्यांना केव्हां केव्हां अघोरी आत्यंतिक अंगमेहनतीचें व श्रमाचें काम करावयास लाविलें आहे. ट्रान्सवालांत सांप्रत कित्येक हिंदी कुटुंबांना सार्वजनिक धर्मादायावर दिवस काढावे लागत आहेत. अनाथ हिंदी स्त्रिया अवर्णनीय हालअपेष्टेंत वाळंत होऊन त्यांचीं अर्भकें जन्मतांच मरण पावलीं आहेत. नवीन आक्टाखालीं नांवनोंदणी करण्याचें नाकबूल केल्यावरून ट्रान्सवालपार करण्यांत आलेल्या हिंदी लोकांना फिरून ट्रान्सवालांत प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्याकरितां ट्रान्सवाल सरकारानें नाताळ व पोर्तुगीज सरकारांशीं गुप्त संगनमत केलें आहे. पोर्तुगीज अधिकाऱ्यांशीं दुसरें एक संगनमत ट्रान्सवाल सरकारनें केलें आहे. या ठरावानुसार अशी व्यवस्था करण्यांत आली आहे कीं, हिंदी लोकांना हद्दपार करण्याचा हुकूम झाला कीं, हिंदुस्थानाकडे यावयास निघालेल्या गलबतांत त्यांना धरून बसविण्यांत येतें. याप्रमाणें, हद्दपार झालेल्या हिंदी लोकांपैकीं पुष्कळ लोक असे असतात कीं, त्यांच्या हिंदुस्थानांत ओळखी किंवा स्नेहीसंबंधी नसतात. यामुळें, हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर उतरल्यावर अन्नवस्त्र व पैसाअडका जवळ नसल्यामुळें, त्यांचे फार हाल होतात. असो; याप्रमाणें, हिंदी लोकांच्या दुःखाची हृदयद्रावक कहाणी आहे. मानवी सुधारणेस लाजविणाऱ्या या अमानुष क्रौर्याचे व रानटी राजकारणाचे परिणाम किती दूरवर पोंचण्याचा संभव आहे, यासंबंधीं विवेचन करूं.

नं. ४—उपसंहार.

## त्यांचीं गाऱ्हाणीं, मागण्या व हालअपेष्टा.

भूतिर्नीचगृहेषु विप्रसदने दारिद्र्यकोलाहलो
नाशो हन्त सतामसत्पथजुषामायुःसमानां शतम् ।
दुर्नीतिं तव वीक्ष्य कोपदहनज्वालाजटालोऽपि सन्
किं कुर्वे जगदीश यत्पुनरहं दीनो भवानीश्वरः ॥
—भामिनीविलास.

## बादशाही सरकारची कर्तव्य-पराङ्मुखता.

या विषयावरील हा आमचा तूर्तचा शेवटला लेख होय. यांत पूर्वेतिहासाची समाप्ति होऊन हिंदुस्थानचें कर्तव्य काय तें सांगितलें आहे. वरील तीन लेखांत ट्रान्सवाल प्रकरणाचा इतिहास आम्ही दिलाच आहे. हा इतिहास संक्षोभकारक व उद्वेगजनक नाहीं असें कोण म्हणूं शकेल ? न्यायाचीं, भूतदयेचीं, नीतीचीं व साम्राज्यविषयक कर्तव्याचीं तत्वें सपशेल पायाखालीं तुडवून ट्रान्सवाल सरकारनें निसर्गदत्त मानवी हक्कांकरितां झगडणाऱ्या सात्विक हिंदी लोकांचा जो अमानुष छल मांडला आहे तो पाहून हिंदुस्थानांतील सर्व लोकांचीं अन्तःकरणें विव्हल होऊन ते क्रोधसंतप्त झाले असल्यास नवल तें काय ? सृष्टींतील विचित्र असमानता पाहून, श्री नीचांची प्रिया होऊन राहिली आहे व सात्विक लोकांचे घरांत दारिद्र्यकोलाहल सुरू आहे वगैरे प्रकार पाहून जगन्नाथ पंडित क्रोधायमान झाले; परंतु 'माझें काय चालणार ? मी पामर व तूं सर्वेश्वर आहेस' असे उद्गार काढून त्यांना स्वस्थ बसावें लागलें. हिंदुस्थानच्या लोकांची स्थिति जवळजवळ अशीच आहे. त्यांच्या हातांत राजसत्ता नाहीं; त्यामुळें आपल्यास देशबांधवांस परराष्ट्रांनीं न्यायानें वागवावें म्हणून आपल्या राष्ट्रीय सामर्थ्याच्या जोरावर त्यांना कांहीं इलाज करितां येत नाहीं. अर्थात्, आपल्या साम्राज्यवर्चस्वाखालच्या एवं देशांत दुबळ्या व राजसत्ताविरहित हिंदी लोकांना न्यायानें वागविण्यांत यावें अशी व्यवस्था करणें हें ब्रिटिश सरकारचें पवित्र कर्तव्य आहे. परराष्ट्रांत एखाद्या इंग्रज मनुष्याला कैद केलें किंवा त्याला वाईट रीतीनें वागविण्यांत आलें, की पार्लमेंटांत प्रश्नोत्तरांचा कडकडाट होऊन अन्यायपीडित इंग्रज मनुष्याच्या दुःखनिवारणार्थ ब्रिटिश राष्ट्राचें अनेकस्वरूपी बळ एकवटतें. ब्रिटिश साम्राज्याची उभारणी न्याय व समता या तत्वांवर झाली आहे असा अभिमान बाळगणाऱ्या ब्रिटिश सरकारानें अशीच कर्तव्यदक्षता ट्रान्सवालांतील अन्यायपीडित हिंदी लोकांसंबंधानें दाखवावयास नको होती काय ? बोअर युद्धापूर्वी बादशाही सरकार हिंदी लोकांच्या वतीनें वारंवार मध्यस्ती करीत होतें; परंतु, ट्रान्सवाल ब्रिटिश सिंहाच्या पंजाखालीं आल्यापासून आपली पूर्वीची न्यायसंमत व शिष्टसंमत भूमिका बादशाही सरकारानें सोडून दिली आहे. क्रमशः, ट्रान्सवाल सरकारची न्यायबुद्धि पार अस्तंगत होऊन व वचनभंगाचा कडेकोट होऊन शेवटीं ट्रान्सवालांतील हिंदी लोक सांप्रतच्या अंधकारमय दुःखगर्तेत येऊन पडले आहेत. बादशाही सरकारनें आपणास बुद्धिपुरस्सर ट्रान्सवालांत आणून विकलें नाहीं तरी उकिरड्यावर फेर टाकून

थावा तसें बादशाही सरकारानें आपणास टाकून दिलें आहे, असें हिंदी लोकांस कळून आल्यामुळें त्यांस आपली एकंदर स्थिति निराशासंचारक वाटत आहे. ट्रान्सवालांतील हिंदी लोकांच्या तर्फेनें श्रेयस्कर मध्यस्ती करण्याची बादशाही सरकारला दोनदां अनुकूल संधि प्राप्त झाली होती. ट्रान्सवालला स्वराज्यदायी शासनसंस्था ( Constitution ) देण्याचे वेळीं तर बिनमोल संधि आली होती. परंतु, बादशाही सरकारनें या संधीचा फायदा न घेतां युरोपियन वसाहतवाल्यांस वाटेल तसें नागवें नाचण्याकरितां—मताधिकारदान करून टाकलें. जातिविषयक भेदाभेद करणारे कायदे मंजुरीकरितां बादशाही सरकाराकडे पाठविले पाहिजेत, असें एक कलम शासनसंस्थेच्या नियमांत समाविष्ट झालें होतें, परंतु ग्रान्सवाल सरकारावर दाब राहण्यासारखें हें कलम नाहीं असें स्पष्टपणें तेव्हांच दिसून आलें. एक युरोपियन डेप्युटेशन लॉर्ड मिल्नर यांच्याकडे गेलें होतें त्यावेळीं मिल्नरसाहेबांनींही सांगितलें कीं, पूर्वीच्या अमदानीप्रमाणें आतांही रूढ झालेल्या जबाबदारीच्या राज्यपद्धतीच्या अमदानींत देखील या प्रतिबंधक कलमाचा विशेष उपयोग केला जाणार नाहीं! शिवाय, पूर्वीच्या क्राऊन कॉलनीच्या अमदानींत म्हणजे ग्रान्सवालास स्वराज्य मिळालें नव्हतें तेव्हां, बादशाही सरकारनें एकदां ग्रान्सवाल सरकारच्या एका कायद्यास मंजुरी देण्याचें अमान्य केलें होतें. परंतु, स्वराज्याची—जबाबदारीच्या राज्यपद्धतीची—अमदानी सुरू झाली तेव्हां पौर्वात्य लोकांसंबंधीं ट्रान्सवाल पार्लमेंटनें पास केलेल्या कायद्यास बादशाही सरकारनें लगेच मंजुरी दिली हें आपण पाहिलेंच आहे! शासनसंस्थेंतील रिझर्वेशन क्लॉज केवळ फार्स असल्याचें आणखी एक उदाहरण घडलें. लॉर्ड एल्जिन यांच्या मुलाखती घेऊन ताजेतवाने होऊन आलेले सर रिचर्ड सॉलोमन यांनीं नवीन पार्लमेंटांत स्वतःस निवडून घेण्याच्या वेळीं आपल्या पहिल्याच भाषणांत उद्दामपणानें जाहीर केलें कीं, शासनसंस्थेचा रिझर्वेशन क्लॉज ( जातिविषयक कायद्यास बादशाही सरकारची मंजुरी घेतली पाहिजे असा प्रतिबंधक नियम ) प्रत्यक्ष व्यवहारांत रद्द झाल्यासारखाच होईल. ग्रान्सवालांतील प्रमुख वर्तमानपत्र ' स्टार ' यानें तर सर सालोमनच्या या भाषणावर असें भाष्य केलें कीं, सर रिचर्ड सॉलोमन हे लॉर्ड एल्जिन यांच्यापासून हा संदेशच घेऊन आले आहेत कीं, स्वराज्योपभोगी ग्रान्सवालनें हिंदी लोकांविरुद्ध कोणतेही कायदे केले तरी ते बादशाही सरकार मंजूरच करील!!! पुढें एकदां एक सार्वजनिक कर्ज उभारण्यासंबंधांत हमी मिळविण्यासंबंधानें ट्रान्सवाल सरकारनें बादशाही सरकारला विनंति केली होती. ट्रान्सवाल सरकारची कर्जाऊ रकमेच्या हमीसंबंधाची विनंति अर्थात् मान्य झाली; परंतु हिंदी लोकांच्यातर्फे मध्यस्ती करण्याचें मात्र बादशाही सरकारास सुचलें नाहीं!

ट्रान्सवालच्या नवीन अमदानींत हिंदी लोकांच्या विरुद्ध आणखी कायदे झाले त्यांसही बादशाही सरकारानें मंजुरी दिली. ग्रान्सवालांत परदेशांहून येणाऱ्या लोकांच्या आगमनास प्रतिबंध करणारा कायदा बादशाही सरकारानें मंजूर केला. मात्र, वसाह-

तींतून मनुष्यांस हाकून लावण्याचा वसाहत सेक्रेटरीस बेलगामी अधिकार देणारें एक कलम बादशाही सरकारनें रद्द केलें. परंतु, वसाहतींतील कितीही दिवसाचा रहिवाशी असला किंवा वसाहतींत त्याचें व्यापारविषयक हितसंबंध कितीही असले तरी तो अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या चळवळींत पडला कीं, त्यास वसाहतींत शिरण्याचा ज्यांना प्रतिबंध करण्यांत येतो अशा लोकांच्या पंक्तीस बसविणारें—व ह्यापुढें हिंदी लोकांस मग ते कितीही सुशिक्षित असोत—वसाहतीचा दरवाजा बुद्धिपुरस्सर बंद करणारें—कलम बादशाही सरकारनें रद्द करविलें नाहीं ! एवढें करूनही बादशाही सरकारचें समाधान न होतां, नांवनोंदणी न झालेल्या लोकांना—ते वसाहतींत पुष्कळ दिवस राहिलेले किंवा जन्मलेले असले तरी—एका परकी राष्ट्राच्या मदतीनें गलबतांत बसवून थेट हिंदुस्थानांत हद्दपार करण्याच्या गुप्त व्यवस्थेसही त्यानें मंजुरी दिली आहे ! अशा रीतीनें हद्दपार झालेल्या मनुष्यांना परत ट्रान्सवालमध्यें जाऊन आपल्या मालमत्तेसंबंधीं वगैरे हक्क शाबीत करण्याची संधि देखील मिळत नाहीं. ह्याप्रमाणें, हिंदी लोक ट्रान्सवालांत राहण्याच्या हक्कास पारखे होतात एवढेंच नव्हे तर स्वकष्टार्जित मालमत्तेसही ते मुकतात. रशियन सरकार व ट्रान्सवाल सरकार यांची तुलना केल्यास रशियाचाच अपमान केल्यासारखा होईल, ही गोष्ट ह्यावरून उघड होत नाहीं काय ?

ट्रान्सवाल सरकारची वशीकरणशक्ति अचाट आहे; कारण बादशाही सरकार ट्रान्सवाल सरकारानें भारल्यासारखें दिसत असून हिंदी लोकांसंबंधानें स्वतंत्र कार्य किंवा स्वतंत्र विचार करण्याची त्याची शक्ति नष्ट झाल्यासारखी दिसते. तोरेबाज, तरुण व मोहक रूपाच्या नायकांच्या ताब्यांत सांपडलेल्या कामलोलुप जरठाप्रमाणें बादशाही सरकारची स्थिति झाली असून साम्राज्यप्रपंचांत ट्रान्सवालच्या बाबतींत तरी त्याचें कांहीं चालत नाहीं असें आजपर्यंतच्या अनुभवावरून दिसून आलें आहे. स्वराज्योपभोगी वसाहतींच्या कारभारांत हात घालण्याचा बादशाही सरकारला कायदेशीर हक्क पोंचत नाहीं हें विलक्षण तत्त्व प्रतिपादन करण्यांत येत आहे; व ह्या तत्त्वास बादशाही प्रधानमंडळ आपल्या कृत्यानें अप्रत्यक्षपणें उत्तेजन देत आहे. हें तत्त्व जर खरें असेल तर जातिविषयक कायद्यास बादशाही सरकारची मंजुरी घेतली असा निर्बंध शासनसंस्थेच्या नियमांत समाविष्ट करण्याचा दांभिकतेचा फार्स करण्याचें प्रयोजन तरी काय ? स्वराज्योपभोगी वसाहतींच्या अनियंत्रित स्वातंत्र्याचें तत्त्व जर खरें असेल तर, उद्यां ट्रान्सवालच्या कायदेकौन्सिलानें तीन नेटिवांपैकीं एकाचा उजवा हात सार्वजनिक मांगाकडून कापून काढावयाचा नियम केल्यास, बादशाही सरकारला ह्या बाबतींत प्रत्यक्ष हात घालूं देणार नाहीं. परंतु, ह्यामुळें अंदाधुंदी माजेल ! असो. वसाहतींच्या अनियंत्रित स्वातंत्र्याचें तत्त्व व्यवहारांत खरें ठरत नाहीं. उदाहरणार्थ, गेल्या वर्षी देशांतील मूळच्या रहिवाशांपैकीं हमालाचें काम करणाऱ्या लोकांना दारू पुरविण्यासंबंधानें एक बिल ट्रान्सवाल सरकारनें पार्लमेंटपुढें आणलें. परंतु, ह्या बिलाविरुद्ध चोंहोंकडे ओरड झाल्यामुळें 'हें बिल काढून घ्या; त्यास आमची मंजुरी मिळणार नाहीं' असें बादशाही सरकारनें कळविलें. बादशाही सरकार ह्याहीपुढें गेलें आहे.

गेल्या वर्षी नाताळ पार्लमेंटनें हिंदी लोकां-विरुद्ध लायसेन्ससंबंधाचे दोन कायदे जवळजवळ सर्वानुमतें पास केले होते; परंतु या कायद्यास मंजुरी देण्याचें बादशाही सरकारानें नाकारिलें. स्वराज्योपभोगी वसा-हतींच्या घरच्या कारभारांत ह्मणजे अंतर्व्य-वस्थेंत बादशाही सरकारनें हात घालणें शक्य नाहीं असें दुसरें एक विधान पुढें आणण्यांत येतें. हें तत्त्व विशिष्ट मर्यादेच्या आंत बरोबर असेल. परंतु, ज्यांचे प्रतिनिधि पार्लमेंटांत नाहींत अशा लोकांसंबंधानें स्वे-च्छेनुसार वाटेल तसे कायदे पसार करण्या-चा ट्रान्सवालला अधिकार आहे काय ? अशी स्थिति असेल तर दहा वर्षांच्या आंत ट्रान्सवालांत तेथील मूळ रहिवाशांवर अत्यंत जुलूम होऊन त्यांचें बंड झाल्याखेरीज राहणार नाहीं; कारण आफ्रिकेंतील मूळच्या रहिवाशांसंबंधानें ट्रान्सवालचें धोरण सर्वतो-परी प्रतिगामी स्वरूपाचें आहे. उदाहरणार्थ, प्रिटोरिया शहरांतील प्राणिसंग्रहालयाकरितां दरवर्षी जितका खर्च ट्रान्सवाल सरकार अंदाजपत्रकांत मंजूर करितें त्याहूनही कमी खर्च आफ्रिकेंतील मूळच्या ९०००० ( नऊ लक्ष ) रहिवाशांच्या मुलांच्या शिक्ष-णाप्रीत्यर्थ होतो असा अंदाज आहे. परंतु, मुख्य मुद्दा हा आहे कीं, हिंदी लोकांना कसें वागवावें हा प्रश्न ह्मणजे ट्रान्सवालवा-स्यांच्या घरची बाबत आहे काय ? साम्रा-ज्याच्या एका भागांतील लोकांनीं दुसऱ्या भागांतील लोक कसे वागवावे या प्रश्नाशीं साम्राज्य सरकारचा अत्यंत महत्वाचा संबंध येत नाहीं काय ? ज्या साम्राज्यछत्राखालीं असल्याबद्दल आह्मी हिंदी लोकांनीं धन्यता मानावी असें सांगण्यांत येतें, त्याच साम्रा-ज्याच्या एका भागांत, परदेशी राष्ट्रीय अनुभवांत भर घालण्याकरितां गेलेल्या व ज्यांनीं राष्ट्रीय कीर्ति निष्कलंक राहावी ह्मणून अपरंपार कष्ट व दारुण क्लेश सहन केले आहेत अशा आमच्या ट्रान्सवालां-तील हिंदी बंधु—भगिनींना निर्घृण क्रौर्यानें व आसुरी अन्यायानें वागविण्यांत येतें या गोष्टीचा हिंदुस्थानच्या तीस कोटी लोकांच्या मनावर काय परिणाम होईल ? हिंदुस्थानांत कोणीही येऊन संपत्तिक लूट करावी व हिंदी लोकांस मात्र हिंदुस्थान ज्या साम्राज्याचा एक घटकावयव आहे त्याच साम्राज्यांतील दुसऱ्या एका भागांत नुसतें लोटनेटकें राहण्याची देखील मनाई असावी याहून अधिक दुःखद व अधिकसा-म्राज्यविघातक गोष्ट कोणती असूं शकेल ?

राजकीय किंवा युक्तायुक्ततेच्या विचारां-मुळें वस्तुस्थिति झांकून ठेवण्याकडे कोणाची प्रवृत्ति असली तरी एक गोष्ट निर्विवाद आहे कीं, आमच्या या गरीब हिंदुस्थानाला राजकारणाच्या इतिहासांत अननुभूतपूर्व अशा महत्वाचा व आणीबाणीचा प्रसंग येऊन ठेपला आहे. बादशाही सरकारच्या प्रधानांकडून अखेर प्रतिपादित झालेलें तत्त्व असें आहे कीं, ब्रिटिश साम्राज्यास साम्रा-ज्यपद प्राप्त करून देणाऱ्या प्रबल हिंदुस्था-नापेक्षां एखादी स्वराज्योपभोगी वसाहत अधिक महत्वाची आहे ! ट्रान्सवालला स्वराज्याची शासनसंस्था मिळाली असल्या-कारणानें एखाद्या परकी राष्ट्राप्रमाणें ट्रान्स-वालच्या बाबतींत आपणांस हात घालतां येणें शक्य नाहीं, असें बादशाही प्रधानांस वाटतें. अशी स्थिति असेल तर साम्राज्य-यंत्राचा कांहीं तरी भाग अत्यंत कमकुवत झाला असला पाहिजे यांत संशय नाहीं. याप्रमाणें वस्तुस्थिति असतां साम्राज्य-

देहात असलेला भयंकर रोग दूर करण्याचे साम्राज्याधिकाऱ्यांनी प्रयत्न केले नाहीत तर साम्राज्याचा समान न्यायतत्त्वाचा पाया केव्हां तरी ढासळून प्राचीन काळांतील रोमन, ग्रीक वगैरे साम्राज्याप्रमाणे ब्रिटिश साम्राज्याची टोलेजंग इमारतही धाडकन् खालीं आदळल्याखेरीज राहणार नाहीं.

## हिंदुस्थानांतील लोकांचें औदासिन्य.

वसाहतींच्या हितसंबंधापुढें हिंदुस्थानचे हितसंबंध म्हणजे कस्पटासारखे आहेत ही कल्पना अर्थात् चुकीची आहे आणि हिंदुस्थानच्या लोकांनीं वेळींच ह्या प्रश्नाचा पूर्ण विचार करून त्यासंबंधीं आपलें मत स्पष्ट रीतीनें व पूर्ण ऐक्यानें प्रदर्शित केलें असतें तर ह्या तत्त्वाचें परिपोषणच झालें नसतें. आजपर्यंत पुष्कळ सभा भरल्या आहेत व ट्रान्सवालांतील हिंदी लोकांसंबंधानें असंख्य सहानुभूतिप्रदर्शक ठराव पास झाले आहेत. परंतु सहानुभूतीची मजल यापलीकडे पोंचलेली नाहीं. ट्रान्सवालांतील देशबांधवांचें दुःखनिरसन करण्याकरितां एकादी कायमची संस्था स्थापन झाली नाहीं किंवा ह्या विषयाचें पूर्ण परिज्ञानही कोणी करून घेतलें नाहीं. तसेंच हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय संबंधाच्या प्रश्नाचा यथासांग अभ्यास करण्याकरितां उत्साही देशभक्तांची एखादी सुसंघटित राजकीय संस्थाहि अस्तित्वांत आलेली नाहीं. परंतु, सांप्रतच्या आणीबाणीच्या प्रसंगीं, हा विषय लोकांच्या डोळ्यांपुढें सदोदित असावा एतदर्थ कांहीं ठाम योजना होणें सर्वतोपरी अवश्य आहे. ह्या बाबतींत असेंच या पुढेंही तटस्थ वृत्ति ठेविली तर ट्रान्सवालांतील सार्वत्रिक अनीतिप्रचुर राजकारणाचा संपर्क दक्षिण आफ्रिकेंतील इतर वसाहतींसही होऊन ह्या उदाहरणाचें परराष्ट्रेंही अनुकरण करितील. किंबहुना, ह्या राजकारणाचें विषमय घुटके प्राशन करण्याचा हिंदुस्थानावरील अखेर प्रसंग आल्याखेरीज राहणार नाहीं.

## लोकपक्षाची एक कमिटी स्थापन झाली पाहिजे.

ह्या कारणास्तव, हिंदुस्थानाबाहेर राहणाऱ्या हिंदी लोकांसंबंधींच्या प्रश्नाची माहिती मिळवून योग्य अभ्यास करून त्यांच्या हितसंबंधाचें संरक्षण करण्याकरितां लोकपक्षाची एक कमिटी स्थापन झाली पाहिजे, अशी आम्ही आग्रहपूर्वक सूचना करितों. ह्या कमिटीसारख्या दुसऱ्या अनेक कमिट्या देशभर स्थापन होऊन ह्या कमिटीसंबंधानें परस्परसहाय्याच्या तत्त्वावर कार्य करावें. शिवाय, सर्व हिंदुस्थानांत जाहीरसभा भरून स्पष्टपणें राष्ट्रमत प्रदर्शित करण्यांत यावें. ह्या प्रकरणासंबंधानें, वजनदार डेप्युटेशन व्हाइसरॉय व गव्हर्नर यांच्याकडे पाठवून ह्या विषयासंबंधानें चर्चा केली पाहिजे. आज ट्रान्सवाल प्रकरण हेंच लोकचळवळीचें व लोकप्रयत्नांचे केंद्र होऊन राहिलें पाहिजे; व ट्रान्सवालांतील अन्यायाचा प्रकार बंद झालाच पाहिजे. सर्व हिंदुस्थानांतील लोकांची परिषद् भरविण्याचीही आम्ही सूचना करितों. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचीं गाऱ्हाणीं व त्यांची सांप्रतची स्थिति ह्या विषयावर परिषदेंत चर्चा व्हावी. अशी एखादी परिषद् भरणें अवश्य आहे हें कोणासही नाकबूल करितां येणार नाहीं. ही राष्ट्रीय परिषद् भरण्यापूर्वीं, हिंदुस्थानांत सर्वत्र सभा भरून लोकमत प्रदर्शित केलें पाहिजे. ह्या चळवळीनें, ट्रान्सवालला शुद्धी-

घर आणण्याचे बाबतींत बादशाही सरकारलाही एका दृष्टीनें पाठबळ दिल्यासारखें होईल.

## मुंबापुरीनें पुढाकार घ्यावा.

विचारगांभीर्य, राजनिष्ठा, एकजुटीनें कार्य करण्याची हिंमत ह्या गोष्टीबद्दल विख्यात असलेल्या मुंबापुरीनेंच ह्या चळवळींत पुढाकार घेणें श्रेयस्कर आहे. कारण, ट्रान्सवालांत हालअपेष्टा भोगीत असलेल्या लोकांपैकीं पुष्कळ लोक मुंबई इलाख्यांतीलच आहेत. आपल्या कन्यापुत्रांचा ट्रान्सवालांत अनिर्वाच्य व अमानुष छळ होत आहे असें पाहूनही मुंबापुरीनें तटस्थ राहणें लांच्छनास्पद होईल. वसाहतींतल्या आपल्या देशबांधवांच्या अनुभवाची हिंदुस्थानच्या लोकांस जरूर आहे; म्हणून ट्रांसवालांतील सांसर्गिक रोगाचा विस्तार झाल्यास राष्ट्रावर एक महत्संकट कोसळल्यासारखेंच होईल. 'यत्रयोगेश्वरः कृष्णो यत्र पार्थोधनुर्धरः' ह्या वचनाप्रमाणें ट्रांसवालांतील आपले देशबांधव कायदेशीर रीतीनें परंतु करारीपणानें झगडून धनुर्धराचें काम करीतच आहेत. हिंदुस्थान योगेश्वर झाल्यास विजयश्री प्राप्त होण्यास कांहीं हरकत आहे काय ?